वर्ष ४३ अंक ३

# बृहन्महाराष्ट्र वृत्त

बृहन्महाराष्ट्र मंडळाचे मुखपत्र

BMM बृहन्महाराष्ट्र मंडळ ॥ मराठी तितुका मेळवावा ॥

On the web
www.bmmonline.org

समस्त मराठीप्रेमींसाठी उत्तर अमेरिकेतील एकमेव मराठी मासिक

मार्च २०२३

## अध्यक्षीय

प्रिय मित्र-मैत्रिणींनो,

मला सांगायला अतिशय आनंद होतोय, की बीएमएम २.० या आपल्या उद्दिष्टाच्या अंतर्गत आपण दोन प्रादेशिक मराठी मैत्री मेळावे करण्याचे निश्चित केले आहे. या प्रकल्पासाठी एकूण दहा मंडळांनी इच्छा व्यक्त केली, त्यातल्या तीन मंडळांनी प्रस्ताव पत्रिका भरल्या, आणि त्यातल्या दोन मंडळांना आम्ही निवडले - ईस्ट-कोस्ट वरील वॉशिंग्टन डीसी चे मराठी कला मंडळ आणि वेस्ट-कोस्ट वरील सिॲटल मराठी मंडळ. बृहन्महाराष्ट्र मंडळ (बीएमएम) प्रादेशिक मैत्री मेळावे आणि बीएमएम अधिवेशन यांच्यात महत्त्वाचा फरक म्हणजे आपण बीएमएम २.०च्या अंतर्गत जे दैनंदिन आयुष्याच्या गरजांकरता उपक्रम चालू केले आहेत, त्यांस एक व्यासपीठ मिळवून देणे! मराठी शाळा, युवा, रेशीमगाठी, बी -कनेक्ट, उत्तररंग, ढोल ताशा, क्रिकेट टूर्नामेंट्स, प्रादेशिक मंडळाचे कार्यक्रम असे विविध वयोगटांचा सहभाग असलेले कार्यक्रम इथे भरणार आहेत. ही मोठी सामाजिक धुरा स्वीकारल्याबद्दल मी वेणुका बोंडे, अध्यक्षा सिॲटल मराठी मंडळ आणि माधवी आगाशे, अध्यक्षा, वॉशिंग्टन डीसी मराठी कला मंडळ यांचे मनःपूर्वक अभिनंदन करतो. सिॲटलमध्ये १३, १४ मे रोजी आणि डीसी मध्ये १५ जुलैच्या आसपास हा मैत्री मेळावा भरणार आहे. त्यात सहभागी होण्यासाठी मी तुम्हाला आज आग्रहाचे निमंत्रण करतो.

राहुल सोलापूरकर यांचा १५ मंडळांचा बीएमएम दौरा जोरात सुरू झाला!




नुकताच आपण भांडारकर ओरिएंटल रिसर्च इन्स्टिट्यूट (बोरी) आणि दे-आसरा या सस्थांबरोबर सामंजस्य करार केला. बोरी संस्था आपल्याला मोठ्यांसाठी मराठी व संस्कृत शिक्षण; आणि दे-आसरा संस्था आपल्या विद्यार्थ्यांना इंटर्नशिपसाठी मदत करणार आहे.

शिक्षण संदर्भात माझी समिती उत्तर अमेरिकेतील मराठी विद्यार्थ्यांसाठी बीएमएम शैक्षणिक स्थायी देणगी-निधी (BMM Educational Endowment for Marathi Resident Students of North America) हा एक नवीन प्रकल्प सुरू करत आहे. या प्रकल्पासाठी बीएमएम एक वेगळे बँक खाते सुरू करत आहे. ज्यातून फक्त कॉलेज ट्युशन-सहाय्य, अनुदान (ग्रँट्स) आणि शिष्यवृत्ती याच्यासाठी पैसे देण्याचे बंधन राहील. या प्रकल्पासाठी आवश्यक असणारी योग्य कायदेशीर तरतूद मी व माझी समिती करत आहोत. या स्थायी देणगी-निधीमध्ये २०२४ जूनपर्यंत दोन मिलियन डॉलर्स जमा करण्याचे माझे स्वप्न आहे. या संदर्भात तुम्हाला काही प्रश्न असतील किंवा मदत करायची इच्छा असल्यास माझ्याशी नक्की संपर्क साधा.

बृहन्महाराष्ट्र मंडळाची सर्व माहिती बीएमएम २.० ॲप मधून आम्ही तुम्हाला नियमितपणे देत आहोत. हे ॲप https://bmm2.page.link/bmmapp संकेतस्थळावरून डाउनलोड करा.

नेहमीप्रमाणे एका श्लोकाने थांबतो:

दृष्टम्, अनुमानम्, आप्तवचनं च सर्व प्रमाण सिद्धत्वात् ।
त्रिविधं प्रमाणमिष्टं, प्रमेयसिद्धिः प्रमाणाद्धि ।।

(अर्थ:- आपण जे पंचेंद्रियांद्वारे अनुभवतो, त्यावर जे निष्कर्ष काढतो, आणि आप्त/विद्या पारंगत/विद्वानांचे म्हणणे या तिन्हीतून सर्व सिद्ध होते आणि सिद्धांत बनतात. सिद्धांतांनी शक्य सिद्ध होते. संदर्भ:- सांख्यकारिका)

आपला नम्र,

संदीपदीक्षित

संदीप दीक्षित (अध्यक्ष, बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरिका)
https://tweeter.com/bmmpresident |
https://www.facebook.com/bmm2022president

#bmm2.0 #communityCentricBMM #MandalMember
#VruttaSubscriber

***

# बृहन्महाराष्ट्र वृत्त

**बृहन्महाराष्ट्र मंडळ उत्तर अमेरिका या संस्थेचे मुखपत्र**

**स्थापना 1981 (शिकागो)**

**संस्थापक**:- कै. विष्णु वैद्य, कै. शरद गोडबोले, जयश्री हुपरीकर

**संपादक:** -विनता कुलकर्णी, शिकागो, इलिनॉय

**अंकासाठी साहित्य/मजकूर पाठविण्याचा पत्ता:-**

vinata.kulkarni@bmmonline.org Or vinata@gmail.com

**बृहन्महाराष्ट्र वृत्त कार्यालय -संपर्क:-**

**BMM Treasurer -** Rajan S Pednekar
20611 Whitebud CT. Tampa FL 33647
Ph- 813-546-1330 Email- Rajan.Pednekar@bmmonline.org

**वर्गणीचे दर:- Printed Copy: $25/ year**

Subscription payment is accepted online by Paypal at:
https://www.bmmonline.org/vrutta/subscription


**जाहिरातींचे दर**

पूर्ण पान: $175 अर्धे पान: $ 100
पाव पान: $ 70 अष्टमांश पान: $ 50

वृत्त दर महिन्यास प्रसिध्द होते. आदल्या महिन्याच्या **२० तारखेपर्यंत** हाती आलेल्या मजकुरातून **निवडक** मजकूर नजिकच्या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्याचे सर्व प्रयत्न केले जातील. मजकूर शक्यतो **युनिकोड मराठीत MS word/Text Fileसह ईमेलने पाठवावा.**

**प्रसिध्द झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतातच असे नाही.**
लिखाणाच्या निवडीचे, प्रकाशनयोग्य किरकोळ बदलाचे आणि व्याकरणीय दुरुस्तीचे अंतिम अधिकार संपादकांकडे राहतील.
पाठवलेल्या साहित्याची पोच ईमेल कळविल्यास दिली जाईल.


**बृहन्महाराष्ट्र मंडळाची कार्यकारिणी (२०२२-२०२४)**

**मताधिकार असलेले सदस्य**

| | | |
|---|---|---|
| **अध्यक्ष:-** | संदीप दीक्षित | क्लिवलँड ओहायो |
| **सचिव:-** | अजित नातू | सॅक्रॅमेण्टो, कॅलिफोर्निया |
| **कोषाध्यक्ष:-** | राजन पेडणेकर | टॅम्पा बे, फ्लोरिडा |
| **सदस्य:-** | अमर उन्हेकर | लिव्हिंग्स्टन, न्यू जर्सी |
| | सविता मोरे | सिॲटल, वॉशिंग्टन |
| | मंजुषा नाईक | वेस्ट पाम बीच, फ्लोरिडा |
| | प्रसाद पानवळकर | ऑस्टिन, टेक्सस |
| | विराज राऊत | सॅन होजे, कॅलिफोर्निया |

**नियुक्त सदस्य**

**माजी अध्यक्ष:-** विद्या जोशी, शिकागो, इलिनॉय

**वृत्त संपादक:-** विनता कुलकर्णी, शिकागो, इलिनॉय

**विश्वस्त समिती:**

**अध्यक्ष :-** मोहित चिटणीस, सिॲटल, वॉशिंग्टन

**सदस्य :-** नितीन जोशी, शिकागो, इलिनॉय

**सदस्य :-** सुनील सूर्यवंशी, रिजफिल्ड, कनेटिकट

...



**प्रकाशक:-** बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरिका
**संकेतस्थळ:-** https://www.bmmonline.org
**इमेल:** vrutta@bmmonline.org



Disclaimer: The advertised business is a wholly independent entity from Bruhan Maharashtra Mandal (BMM). BMM is neither liable nor responsible for any actions or communications between third parties and the advertised businesses, including parents and subsidiaries of the advertised businesses.


# या अंकात


| | पान क्र. |
|---|---|
| - अध्यक्षीय | १ |
| - बृ.म. मंडळ अधिवेशन, बे एरिया- २०२४- वार्ता | ३ |
| - बृ.म. मंडळाचा- प्रादेशिक मैत्री-मेळावा' २०२३-वार्ता | ४ |
| - * जागतिक महिलादिनानिमित्त:- मुलाखत:- 'ज्योतीने तेजाची आरती' | ५ |
| - डॉ. किशोर ग. कुलकर्णी यांचे अभिनंदन | ६ |
| - *कविता:- ती सावित्री, चारोळी:- मिलाप शब्दांचा | ७ |
| - *लेख, कविता:- देवीपद | |
| - लेख:- कारगाथा- भाग १: यहुदी समज-गैरसमज | ८ |
| - पुरवणी ऑनलाईन- अनुक्रम | ९ |
| - 'शब्दफोड'- मराठी भाषकांसाठी मनोरंजनाचा खेळ | १० |
| - Business Advertisement | ११ |
| - बृ.म. मंडळाचे काही प्रकल्प पृष्ठ २ आणि ......... | १२ |


## बृहन्महाराष्ट्र मंडळाचा प्रकल्प - 'वारसा'

**YouTube मालिका - भाग तिसरा**

**"इवलेंसे रोप लावियलें द्वारी"**

**अनीताताई गोडबोले-**

अमेरिकेत आगमन - १९६३



एखादे रोप छान डेरेदार वृक्षात रूपांतरित झालेले बघायला किती विशेष वाटते नाही का? त्यातूनही जर ते रोप ज्यांनी लावले, त्याची सुरुवातीची काळजी घेऊन वाढवले, अशा व्यक्तीशी प्रत्यक्षात बोलायला मिळाले तर दुग्धशर्करा योग! हा योग या मुलाखतीद्वारे जुळवून आणला आहे. तो वृक्ष म्हणजे आपल्या सर्वांच्या जिव्हाळ्याची, गेली ४३ वर्षे यशस्वीपणे कार्यरत संस्था- बृहन्महाराष्ट्र मंडळ (बीएमएम). शरद गोडबोले आणि त्यांच्या पत्नी अनीताताई व काही मित्रमंडळंनी मिळून, शिकागो मंडळाची व विशेषत: बीएमएमची मुहूर्तमेढ कशी रोवली, हे अनीताताईंच्या या मुलाखतीद्वारे जाणून घेऊया.

वारसा मालिकेचा हा तिसरा भाग पहाण्यासाठी खालील (link) क्लिक करा किंवा तुमच्या mobile phone वरून इथे दिलेला QR code scan करा.

खालील यू ट्युब चॅनेलला like आणि subscribe करा. आणि अभिप्राय कळवायचा, बरं का?

Episode 3:-
**https://youtu.be/ULOOVhnjW7E**

Past Episodes:-
**https://www.youtube.com/@bmm-varasa/videos**

***


# बृहन्महाराष्ट्र मंडळ अधिवेशन, बे एरिया २०२४ - वार्ता

**- बृ.म. मंडळ अधिवेशन २०२४ कार्यकर्ते** (महाराष्ट्र मंडळ बे एरिया, कॅलिफोर्निया)

**स्मरणिका विभाग:**

मंडळी, २०२४ सालच्या अधिवेशनातील स्मरणिकेचा विषय आहे, 'अमेरिकेने मराठी माणसाला लावलेला रंग, मराठी माणसाने अमेरिकेला लावलेला रंग, आणि त्यातच त्याने हृदयात जपून ठेवलेला स्वतःचा मराठी रंग'.

डिसेंबर २०२२ पासून आमची चौदा जणांची टीम स्मरणिकेच्या कामासाठी सज्ज झाली आहे. युवा गटात मोडणाऱ्या आमच्या सर्वात तरुण सदस्यापासून ते ज्येष्ठ गटात मोडणाऱ्या आमच्या सल्लागारांपर्यंत सगळेच आपापली व्यवसाय कौशल्ये घेऊन आली आहेत. तरी अगदी लहान मुलाच्या कुतूहलाने आणि जिज्ञासेने स्मरणिकेसंबंधातील नवनवीन गोष्टी शिकताहेत, हेच आमच्या टीमचं वैशिष्ट्य. त्याचाच भाग म्हणून गेल्या महिन्यात 'अक्षरधारा'च्या संपादिका स्नेहाताई अवसरीकर ह्यांनी मार्गदर्शनपर कार्यशाळा घेतली. अंक चांगला बनविण्यासाठी लागणारी बारीकसारीक माहिती, त्यातील



खाचा-खोचा त्यांनी अतिशय सोप्या पध्दतीने समजावून सांगितल्या.

तसेच फेब्रुवारीमध्ये, २०२२ सालच्या बृ. म. मंडळ अधिवेशन स्मरणिकेच्या संपादक मंडळातील नितीनजी अष्टेकर आणि छायाताई आराणके, ह्यांनीही आम्हाला स्मरणिकेची रूपरेषा, वेळापत्रक, छपाई ह्यांविषयी त्यांचे अनुभव सांगून सतर्क केले.

कोविडनंतर एकमेकांना झूम किंवा व्हॉट्सअॅप मीटिंगद्वारे भेटणे, काम करणे हेच रूढ झाले असताना, जानेवारी २०२३ मध्ये आम्ही सगळे प्रत्यक्ष भेटलो. स्मरणिकेच्या मजकुराची रूपरेषा ठरविणे हा त्यामागील मुख्य हेतू. ह्या तीन-साडेतीन तासांच्या बैठकीत मुख्य मजकूर विषयाबरोबरच बालविभाग, युवाविभाग आणि ज्येष्ठ विभागाच्या स्वरूपाविषयीही बरीच चर्चा झाली. गेल्या काही दिवसात वेगवेगळे गट मुख्यतः मुद्रण, छपाई, इबुक (इ-पुस्तिका), ऑडिओबुक (श्रवण पुस्तिका) सेवा पुरविणारे, त्यांचा अंदाजे खर्च ह्यावर संशोधन करत आहेत.

**भोजन विभाग:**

फेब्रुवारी १३, २०२३ रोजी भोजन समितीची, बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या पदाधिकाऱ्यांबरोबर बैठक झाली. ज्यामध्ये अधिवेशनात होणाऱ्या 'नाश्ता व भोजन' यांच्या नियोजनाचा आराखडा सादर केला गेला. त्याचप्रमाणे पुढे वर्षभर होणाऱ्या कार्यक्रमासंबंधित सखोल चर्चासत्र झाले आणि सांगण्यास आनंद होतो आहे, की आम्ही दिलेल्या कार्यक्रमाची संकल्पना व नियोजन त्यांच्या पसंतीस आले असून त्यांनी केलेल्या कौतुकाने स्वयंसेवकांचा आनंद आणि उत्साह द्विगुणित झाला आहे. भोजन समितीतर्फे आगामी महिन्यांमध्ये काही स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहेत. काही स्थानिक असतील तर काही ऑनलाईन असतील. याबाबत अधिक माहिती पुढील अंकात देण्यात येईल.

***

# बृहन्महाराष्ट्र मंडळाचा 'प्रादेशिक मराठी मैत्री मेळावा'

## || वारसा जपू संस्कृतीचा, बंध जोडू मैत्रीचा ||

**- वेणुका बोंडे** (अध्यक्ष, सिॲटल महाराष्ट्र मंडळ, २०२३)
Venukabonde@gmail.com, President@seattlemm.org
www.seattlemm.org



नमस्कार मंडळी,

आम्हाला सांगण्यास अत्यंत आनंद होत आहे, की या वर्षी बृहन्महाराष्ट्र मंडळाकडून प्रादेशिक मराठी मैत्री मेळावा आयोजित केला जात आहे आणि या मैत्री मेळाव्याचे मुख्य-यजमानपद सिॲटल महाराष्ट्र मंडळाला लाभले आहे.

तुम्हाला नक्कीच प्रश्न पडला असेल, काय आहे हा मैत्री मेळावा? आणि कधी, कुठे असणार आहे?

हा आहे उत्सव आपल्या संस्कृतीचा, आपल्या मायबोलीचा, आपल्या मराठीपणाचा आणि आपल्यातील बंध घट्ट करणाऱ्या मैत्रीचा!

सिॲटल महाराष्ट्र मंडळ दोन मंडळांबरोबर यंदा मे महिन्यात हा सोहळा साजरा करणार आहे, आणि ही दोन मित्र मंडळे आहेत,-पोर्टलँडचे 'ओरेगॉन मराठी मंडळ', (अंजली जोशी - अध्यक्ष) आणि मराठी सोसायटी ऑफ ब्रिटिश कोलम्बिया, हे व्हँकूव्हर, कॅनडा मधील मराठी मंडळ (पराग सहस्रबुद्धे - अध्यक्ष).

शनिवार १३ मे आणि रविवार १४ मे, २०२३ असा दोन दिवस हा सोहळा असेल. या मैत्री मेळाव्याची संकल्पना असणार आहे,

**वारसा जपू संस्कृतीचा, बंध जोडू मैत्रीचा!**

आपल्या संस्कृतीचं जतन करताना मैत्रीचेही बंध घट्ट जोडूया. शिवाय आपल्या स्थानिक कलाकारांना कलागुण दाखवण्याची संधी देणे, त्यांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे, हेदेखील ह्या मैत्री मेळाव्याचे एक उद्दिष्ट आहे.

या मैत्री मेळाव्याच्या पहिल्या दिवशी नाटक, संगीत, वादन, नृत्य आणि बरंच काही असे दर्जेदार सांस्कृतिक कार्यक्रम असतील. मराठी मनाला भावतील व रूचतील अशीच कार्यक्रमांची आखणी असेल.

मेळाव्याचा दुसरा दिवस असेल गाठीभेटींचा. उपवर वधूवरांच्या भेटी 'रेशीमगाठी' या उपक्रमाद्वारे होतील. शिवाय मराठी उद्योजकांच्या गाठीभेटी, कवी संमेलन, मराठी शाळेतल्या मुलांचे कार्यक्रम, युवा संमेलन, ज्येष्ठ नागरिकांच्या गप्पाटप्पा, कराओके असे विविध कार्यक्रम असतील.

मराठी मैत्री मेळावा आणि त्यात खाण्याविषयी उल्लेख नाही, असं कसं होईल? ह्या दोन दिवसाच्या मेळाव्यात विविध, चविष्ट मराठमोळ्या खाद्यपदार्थांची रेलचेल असेल. पट्टीच्या खवय्यांसाठी ही एक पर्वणीच!

गेल्याच वर्षी भारताच्या स्वातंत्र्यदिनाचा अमृत महोत्सव साजरा झाला. त्या पार्श्वभूमीवर मैत्री मेळाव्यातील तीन मंडळांच्या पेहरावासाठी आपल्या तिरंग्यातील रंग आम्ही निवडत आहोत- केशरी, पांढरा आणि हिरवा. ह्या तीन रंगातील मराठमोळ्या पेहरावात नटून थटून आलेली मंडळी किती छान दिसतील, हो ना!

स्वागतास रांगोळी, ढोल-ताशापथकांचे सादरीकरण, नाविन्यपूर्ण फोटोंसाठी फोटोबूथ, मराठी संस्कृतीचे प्रतिबिंब दाखवणारी सजावट अशा अजून बऱ्याच गोष्टी असतील.

कार्यक्रमाची सविस्तर माहिती आम्ही तुम्हाला वेळच्यावेळी देऊच. नावनोंदणीची तारीख निश्चित झाली, की आम्ही कळवू आणि तिकिटाची लिंकही देऊ.

दोन दिवसांची ही आनंदयात्रा आपल्या सर्वांसाठी संस्मरणीय ठरेल, अशी खात्री आम्ही नक्की देतो.

ह्या मैत्री मेळाव्यास तुमच्या पाठिंब्याची, शुभेच्छांची आणि आशीर्वादाची गरज आहे.

**आनंदाचा प्रत्यय यावा,**
**तुमचा आमचा सूर जुळावा**
**संस्कृतीचा सुंदर देखावा,**
**मौजमजेचा अक्षय ठेवा**
**सुंदर क्षणांचा असेल पुरावा,**
**BMM मराठी मैत्री मेळावा**
कळावे, लोभ असावा!

...

**वार्तालेखन: -**
**अश्विनी क्षीरसागर** (उपाध्यक्ष - सिॲटल महाराष्ट्र मंडळ)



***

# 'ज्योतीने तेजाची आरती' : विदुषी जयंती सहस्रबुद्धे

- **अनिता म. कांत** ( सॅन होजे, कॅलिफोर्निया)



एक सुरेल आणि गुणी गायिका म्हणून **सौ. जयंती सहस्रबुद्धे** यांची ओळख उत्तर अमेरिका आणि भारतातील संगीतप्रेमींना आहे. जयंती ह्या सुप्रसिद्ध गायिका पंडिता सौ. **वीणाताई सहस्रबुद्धे** यांच्या शिष्या आणि स्नुषा आहेत. त्यांच्या संगीताचा रंजक आणि प्रेरणादायी प्रवास सर्वांसमोर मांडावा म्हणून त्यांच्याशी केलेली ही बातचीत.



**अनिता:** जयंती, तुमचा संगीताकडे ओढा कसा निर्माण झाला?

**जयंती:** अनिताताई,आमच्या घरात सगळ्यांनाच संगीताची आवड होती. माझ्या आईवडिलांनी मला गाण्यासाठी प्रोत्साहित केले. माझी आजी मास्टर कृष्णराव फुलांब्रीकरांकडे गाणे शिकत असे. माझ्या आईने पंडित पुरुषोत्तम वालावलकर यांच्याकडे संगीताचे धडे घेण्यास सुरुवात केली आणि तिच्याबरोबर मीही वयाच्या पाचव्या वर्षी हार्मोनियम शिकायला लागले. मला आठवतंय, की आठ वर्षांची असताना मी परम पूज्य श्री पांडुरंगशास्त्री आठवले यांच्यासमोर माझी कला सादर करून शाबासकी आणि आशीर्वाद मिळवले होते. सुप्रसिद्ध गायक श्री मन्ना डे हे आमच्या शेजारी राहायचे. त्यांनीही मला खूप उत्तेजन दिले.

**अनिता:** तुम्ही गायनाकडे कशा वळलात?

**जयंती:** शाळेत असताना संगीत महाभारती या संस्थेत विदुषी तुलिका घोष, (पंडित निखिल घोष यांनी कन्या) यांच्याकडून गाणे शिकण्याचे सौभाग्य मला प्राप्त झाले. इथे मी अनेक दिग्गजांचे गाणे ऐकले आणि त्यांना तानपुऱ्यावर साथ करण्याची संधीही मला प्राप्त झाली. शिवाय, पंडित निखिल घोष, पंडित नयन घोष आणि पंडित ध्रुब घोष यांचा रियाझ ऐकणे, ही तर एक पर्वणीच होती. मी काही काळ पंडित अनीश प्रधान यांच्याकडून तबल्याचे धडे घेतले. पुढे पंडित ध्रुब घोष यांनी मला संगीत महाभारतीतील संग्राह्य ध्वनिफितींची सूची करायचे काम दिले. माझा आनंद गगनात मावेना. त्या स्वर्गीय संगीताचे माझ्या गाण्यावर उत्तम संस्कार झाले. दरम्यान मास्तर वालावरकरांच्या शिफारशीमुळे विदुषी श्रीमती शोभा गुर्टू यांच्याकडे काही काळ शिक्षण घेण्याचे सौभाग्य मला प्राप्त झाले.

**अनिता:** मग वीणाताईंकडे तुम्ही कधी शिकू लागलात?

**जयंती:** महाविद्यालयीन काळात मी मुंबईतील काळा घोडा येथील Rhythm Houseला नियमित भेट देत असे. एकदा मी सहजच वीणाताईंची "Tribute to Miyan Tansen" ही ध्वनीफीत विकत घेतली. मग काय! वीणाताईंच्या स्वर्गीय आवाजाची मोहिनी माझ्या मनावर चढली.

वीणाताईंची शिष्या होणे हेच मला माझ्या आयुष्याचे स्वप्न वाटू लागले. मी त्यावेळी लॉस एंजेलिस'मध्ये कॅलिफोर्निया युनिव्हर्सिटीत एथनोम्युसिकोलॉजिस्ट प्रोफेसर नझीर जयराजभोय यांच्या हाताखाली पूर्ण शिष्यवृत्तीसह मास्टर्स पदवी शिक्षण घेण्याची सुवर्णसंधीही नाकारली. त्यावेळी वीणाताई मैफिलींमध्ये व्यस्त असल्यामुळे नवीन विद्यार्थी घेत नव्हत्या. कित्येक महिन्यांनी त्यांनी मला त्यांच्या क्लासमध्ये बसून त्या विद्यार्थांना जी तालीम देत असत ती ऐकण्याची परवानगी दिली. मी दर आठवड्याला मुंबईहून पुण्याला जात असे. त्या विद्यार्थ्यांना जे शिकवत ते कानांत साठवून ठेवत असे. एकलव्याप्रमाणे चाललेल्या माझ्या त्या तपश्चर्येला कधी ना कधी फळ येईल, ही माझी दृढ निष्ठा होती. आणि तो दिवस आला! मी तिथल्या विद्यार्थ्यांना 'पेइंग गेस्ट' म्हणून राहण्याची काही सोय होईल का, असे विचारत असता वीणाताईंनी ऐकले. त्यांनी मला विचारले, की मला त्यांच्याजवळ राहून गाणे शिकायला आवडेल का? माझा माझ्या कानांवर विश्वासच बसेना. त्यांनी जवळ जवळ दीड वर्षे माझी परीक्षा घेतली. मी त्यात उत्तीर्ण झाले. त्या माझ्या गुरू, आई, मैत्रीण झाल्या आणि पुढे सासूबाईही!

**अनिता:** वीणाताई गुरू म्हणून कशा होत्या?

**जयंती**: आई (सासूबाई) आणि माझ्यामध्ये एक खास भावबंध होता: गुरु-शिष्याचा, आई-मुलीचा आणि मैत्रिणीचा. त्यांनी माझी खूप काळजी घेतली. चोवीस तास त्यांच्या मनात संगीताचा विचार असे. अगदी आम्ही दोघी स्वयंपाकघरात काम करतानाही त्या मला संगीतातल्या खुब्या शिकवत असत. त्यांनी संसार आणि संगीतातले आपले कार्य यांच्यात उत्तम समतोल सांधला होता. त्या सर्वांशी नम्रतेने आणि आपुलकीने वागत असत. एक गुरू म्हणून त्यांनी आपल्या सर्व शिष्यांना भरभरून ज्ञान दिले. छोट्यातील छोटे काम त्या मन लावून पूर्ण करीत असत. ते योग्य तऱ्हेने पूर्ण होईस्तोवर त्यांना समाधान मिळत नसे. पंडित विष्णू दिगंबर पलुस्कर यांची धरोहर त्या पुढे चालवत होत्या. त्या विद्यार्थ्यांना आपल्या आवाजात गायला सांगत असत. अंध अनुकरण करण्यास त्यांचा विरोध होता. विद्यार्थ्यांनी स्वत:ची अभिव्यक्ती विकसित करावी याबद्दल त्या आग्रही होत्या.

**अनिता:** वीणाताईंबरोबर मैफिलींसाठी भारतभर/जगभर फिरण्याचा काय अनुभव होता?

**जयंती**: आईंबरोबर भारत, युरोप, अमेरिका येथे मी दोनशे मैफिलींत साथ केली. या काळात मी त्यांच्याकडून खूप शिकले. प्रत्येक मैफिलीनंतर मी माझ्या वहीत वीणाताईंच्या गायनातील सगळे बारकावे नमूद करून ठेवत असे. एक मैफील माझ्या खास स्मरणात आहे. पंडित रवीशंकर यांच्या बहात्तराव्या वाढदिवसाच्या निमित्ताने सुकन्याताईंनी त्यांच्या

दिल्लीच्या घरी आईंचे गाणे ठेवले होते. यावेळी पंडितजी, (रवीशंकर), पंडित मल्लिकार्जुन मन्सूर, विदुषी नैना देवी, पंडित बिरजू महाराज, उस्ताद अमजद अली खान साहेब यांच्यासारख्या बड्या हस्ती श्रोत्यांमध्ये उपस्थित होत्या. आईंबरोबर प्रवास करताना त्यांचे संगीतावरचे विचार मला जवळून समजून घेता आले. पंडित कुमार गंधर्व, आपले वडील पंडित शंकर श्रीपाद बोडस, मातोश्री शांताबाई बोडस, बंधू पंडित काशिनाथ बोडस यांच्या आठवणी त्या सांगत असत. गाडीत त्या मला ताना, बंदिशी शिकवत आणि लिहून ठेवायला सांगत असत. काशिनाथजी मला तेव्हा "वीणाची सावली" असेच संबोधत. त्या आपल्यासाठी स्वरचित खयाल, बंदिशी, भजनांचा मोठा खजिना सोडून गेल्या आहेत. त्यांच्या चाहत्यांच्या मनात त्या नेहमीच वास करून राहतील.

**अनिता:** तुम्ही गाजवलेल्या मैफिलींपैकी आठवणीत राहिलेल्या कार्यक्रमांविषयी जरूर सांगा.

**जयंती:** १९९९ साली बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या सॅन होजे येथे भरलेल्या अधिवेशनातील मैफील तसेच २०१५ साली लॉस एंजेलिस येथे भरलेल्या अधिवेशनातील देवी-शक्ती या विषयावरील मैफील नक्कीच खास आहेत. बसंत बहार या संस्थेने स्टॅनफर्ड येथे आयोजित केलेल्या पहिल्या वार्षिक उत्सवात पद्मश्री पंडित स्वपन चौधरी यांनी मला तबल्यावर साथ केली होती. उस्ताद अली अकबर खान साहेबांच्या वार्षिक जयंती उत्सवात मी अनेकदा आपली गायन सेवा सादर केली आहे. फूटहिल कॉलेज, यूसी डेव्हिस, गंधर्व महाविद्यालय, कला भारती; इंडियन क्लासिकल म्युझिक फ़ेस्टिवल, बहामास; पंडित रविशंकर यांनी स्थापन केलेले लॉस एंजेलिसमधील संगीत मंडळ; भवन्स कल्चरल सेंटर, स्मिथसोनियन नॅशनल म्युझियम ऑफ एशियन आर्ट, भारतीय दूतावास, कॅलिफोर्निया आर्टस् असोसिएशन, द इंडियन म्युझिक सोसायटी ऑफ मिनेसोटा; फ्राईट अँड सॅल्वेज, बर्क्ले या संस्थांनी माझे कार्यक्रम आयोजित केले आहेत. तसेच मी अक्षयपात्र, साहाय्य इंटरनॅशनल, प्रोग्रेसिव सुपर न्युक्लीअर पाल्सी, आर्ट ऑफ लिव्हिंग या संस्थांच्या निधी संकलनासाठी कार्यक्रम केले आहेत.

**अनिता:** तुम्हाला मिळालेल्या पुरस्कारांविषयीही ऐकायला आवडेल.

**जयंती:** मला अनेक मान सन्मान मिळाले आहेत. त्यापैकी भारत सरकारची दोन वर्षांची हिंदुस्थानी शास्त्रीय संगीतासाठी राष्ट्रीय सांस्कृतिक प्रतिभा शोध शिष्यवृत्ती, मुंबई विद्यापीठाच्या मास्टर्स पदवी परीक्षेत (Masters in Music and Masters in Sociology and Anthropology) मिळालेला प्रथम क्रमांक माझ्यासाठी महत्त्वपूर्ण आहे. **मी सहा वर्षांची असताना भारताच्या राष्ट्राध्यक्षांच्या हस्ते माझ्या चित्रकृतीला रौप्य पदक मिळाले होते.** पुण्यातील गानवर्धन संस्थेतर्फे 'संगीत मार्तंड' हा पुरस्कार पंडित जसराज यांच्या हस्ते स्वीकारताना खूप आनंद झाला होता.

**अनिता:** विविध विषयांवरही तुम्ही जे अभ्यासपूर्ण कार्यक्रम सादर करता, त्याबद्दल थोडे सांगाल का? तसेच भविष्यातील काही योजना?

**जयंती:** एखाद्या विषयावरील कार्यक्रम सादर करताना तो मनोरंजक पण माहितीपूर्ण होईल याची मी काळजी घेते. तराणा, ऋतू-संगीत, सुनो भाई साधो, स्वरांजली: विदुषी वीणाताई सहस्रबुद्धे यांना श्रद्धांजली, मीरेची भजने, **कबीर भजने**, नाद निनाद: पंडित शंकर श्रीपाद बोडस, पंडित काशिनाथ बोडस, विदुषी वीणाताई सहस्रबुद्धे यांच्या शास्त्रीय रचना, सुंदर श्याम हमारे, 'Colors of Divine Love': तेरा ते सतराव्या शतकातील भारतीय संत कवींच्या रचना, रामरंग: पंडित रामाश्रय झा यांच्यावर श्रद्धांजलीपर कार्यक्रम, असे अनेक कार्यक्रम मी केले आहेत. पुढेही गाण्याच्या मैफिली व संगीतावर आधारित प्रकल्प करण्याचा मानस आहे. मी बे एरियातील अनेक होतकरू विद्यार्थ्यांना संगीत शिकवत आहे. वीणाताईंची परंपरा पुढे चालवण्याचा मी प्रयत्न करीत आहे. त्यांना आपल्या शिष्येचा अभिमान वाटेल असे भरीव काम हातून घडावे अशी इच्छा आहे.

**अनिता:** परम पूज्य चिन्मयानंद स्वामींनी तुमचे नाव जयंती ठेवले आणि ते तुम्ही आपली कला, मेहनत, आईवडिलांनी दिलेली प्रेरणा तसेच गुरुजनांचे आशीर्वाद यांच्या बळावर सार्थ केले. नवीन पिढीला तुमच्याकडून खूप घेण्यासारखे आहे. वीणाताई जिथे कुठे आहेत, तेथून त्या तृप्त मनाने तुम्हाला आशीर्वाद देत आहेत. आमच्या सगळ्यांच्याही मन:पूर्वक शुभेच्छा!

***

## अभिनंदन!

**डॉ. किशोर गणेश कुलकर्णी** (Ph.D.) , मेट्रोपॉलिटन स्टेट युनिव्हर्सिटी ऑफ डेन्वर येथील अर्थशास्त्राचे प्रतिष्ठित प्राध्यापक (अधिक माहिती- www.kulkarnibooks.com , Published papers - www.researchgate.net) यांची सोसायटी ऑफ इंडियन ॲकॅडमिक्स इन अमेरिका (SIAA, www.siaaus.com) च्या कार्यकारी समितीने २०२३ पासून पुढील अध्यक्ष म्हणून एकमताने निवड केली आहे. SIAA २१-२२ डिसेंबर २०२३ रोजी सुरत, गुजरात येथे आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित करणार आहे.



सध्या SIAA शैक्षणिक क्षेत्रातील आवडीच्या विषयांवर दर महिन्याला वेबिनार आयोजित करते. यापूर्वीचे SIAA चे माजी अध्यक्ष- डॉ. रवींद्र कुलकर्णी (२०२०-२०२२) आणि प्राध्यापक हृषिकेश विनोद (२०१७-२०२०) यांचा पदभार २०२३ पासून प्राध्यापक किशोर कुलकर्णी सांभाळतील.

बृहन्महाराष्ट्र मंडळातर्फे डॉ. किशोर ग. कुलकर्णी यांचे अभिनंदन आणि SIAAच्या अध्यक्षपदावरील त्यांच्या पुढील कारकिर्दीसाठी त्यांना शुभेच्छा!

***

## ती सावित्री

**प्रिया गोडबोले** (एडिसन, न्यू जर्सी)



साक्षर सावित्री
अक्षर सावित्री
स्वाक्षरीची खात्री
तुझ्यामुळे ||१||

मनी कितवर
संभ्रम तत्पर
घालव सत्वर
शंकासुरा ||२||

उचलुनी वसा
ठरवुनी मना
चेतवुनी जना
अभ्यासाशी ||३||

अवघड तिढा
डोंगरा एवढा
संघर्ष केवढा
शिकवाया ||४||

जाणुनी अध्याय
विद्येने विनय
वेळ अपव्यय
न क्वचित ||५||

स्वप्नात भेटती
कन्यका मनस्वी
होऊनी यशस्वी
जीवनात ||६||

शिकुनी गणती
करुनी वाचन
समान शासन
सर्वांसाठी ||७||

स्वदेशी उद्धार
गौरव अपार
उद्दिष्ट साकार
हर्ष मोद ||८||

तुझी दूरदृष्टी
ज्ञानाचीच पुष्टी
आंतरिक तुष्टी
समाधान ||९||

सरस्वती तूच
तूच पूजनीय
तूच माननीय
विश्वलोकी ||१०||

***

## मिलाप शब्दांचा



**- कांचन गोडबोले** (क्लीव्हलँड, ओहायो)

**जागतिक कविता दिन**
**-२१ मार्च निमित्त-**

कवितेला नसते कुठले मोजमाप,
ती कशी येते? कुठून येते? येते ती आपोआप,
जसे गायकाप्रमाणे, वेगवेगळा घडतो आलाप,
तसे विचारांचा आणि शब्दांचा आगळावेगळा मिलाप!

***

## देवीपद

**- विनता कुलकर्णी** (शिकागो, इलिनॉय)

जागतिक महिला दिन आला, की चर्चा सुरू होते, स्त्रियांच्या कर्तबगारीची, संघर्षाची, पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रीला मिळणाऱ्या दुय्यम दर्जाची! २१व्या शतकाच्या दोन दशकोत्तर- आजच्या काळात अवकाशयान ते पाणबुडी, सैनिकी-ते नागरी सेवा, बहुतेक सर्व क्रीडा, व्यवसाय व कलाक्षेत्रात स्त्रिया यशाची शिखरे पादाक्रांत करत आहेत. तरीही अजून बरंच उजाडायचं आहे.

खुद्द अमेरिकेच्या जनगणना ब्युरोच्या २०२०मधील त्रैमासिक कार्यबल निर्देशकानुसार (ही सर्वात अलिकडील राष्ट्रीय आकडेवारी), अमेरिकेत महिलांनी पुरुषांपेक्षा ३०% कमी कमावले; आणि वयानुसार स्त्रीपुरुष वेतनातील ही तफावत वाढत गेली. जागतिक आरोग्य संघटनेने (WHO) प्रकाशित १६१ देशातील पाहणीनुसार, ३० टक्के महिलांना त्यांच्या आयुष्यात कौटुंबिक जोडीदार, पालक, किंवा अज्ञात व्यक्तिद्वारे शारीरिक आणि/किंवा लैंगिक हिंसाचाराला सामोरे जावे लागले आहे. ५५ विकसनशील देशांमधील सर्वेक्षणानुसार, घरातील आर्थिक स्थिती किंवा भौगोलिक स्थान काहीही असो, माध्यमिक शालेय शिक्षणात मुलांपेक्षा अधिक मुली शाळा सोडून देतात. युनेस्कोच्या अहवालानुसार, जगातील ७७५ दशलक्ष निरक्षर प्रौढांपैकी सुमारे ६७ टक्के महिला निरक्षर आहेत. गेल्या २० वर्षात या प्रमाणात फारसा फरक नाही. हे आकडे पुरेसे बोलके आहेत.

स्त्रीपुरुष समानतेचे प्रयत्न अनेक स्तरावर प्रगतीशील आहेत, तरी, बराच पल्ला गाठायचा आहे. तोवर तळागाळातील स्त्रिया दुर्लक्षित आणि मध्यम-वर्गीय स्त्रिया समाजाने लादलेल्या प्रतिमा स्वीकारून, वाटचाल करत राहतील, अष्टभुजा देवी बनून! त्यांच्याविषयी थोडे, खालील कवितेत!

### देवीपद

लोक पूजती दिव्यत्वाचा, जरी मुकुट,
त्या ललना का स्वीकार करीं, देवीपद?
लोकअपेक्षा पूर्ण कराया, सतत व्यस्त
का घेती हो, भार शिरावर, अमर्याद?
त्या स्त्रियांना पूजाहेतू, माहित नाही का?...

टाळ वाजती देवीसमोर, जोशपूर्ण
उत्साहाने आरतीगान, करती जन
परि आत्मस्थान निवडीचे तिज, न स्वातंत्र्य
देखाव्यांच्या मखरात तिचे, वास्तव्य !
त्या स्त्रियांना समाजवृत्ती, माहित नाही का?...

देवी पुढ्यात नैवेद्याचे, सुबक ताट
दानस्वरूपी वस्त्राभूषण, असा थाट
कर जोडूनी लोक सांगती, तिज इप्सित
अन् देवीचे वचन 'तथास्तु', अपेक्षित !
त्या स्त्रियांना ही जनरीती, माहित नाही का?...

तरी मुखवटा, देवीचा त्या, चढवती !
श्वासासंगे अष्टावधान, जागवती
अष्टभुजेची सार्थ भूमिका, बजावती
केवळ इतुके त्या स्त्रियांच्या, द्वि-हाती ?

***

# कारगाथा

## भाग १: यहुदी समज-गैरसमज

**- वासंती मुदकण्णा** (मिनिआपोलिस, मिनेसोटा)



काळ नव्वदीचा. तीन महिन्याच्या कॉंट्रॅक्टवर मी ऑस्ट्रेलियात आले होते पण आता एक वर्ष होत आले होते. मेलबर्नमधली ट्रॅम आणि मेट्रोची सोय चांगली होती. महिन्याचा पास काढला, की मी कुठेही जाऊ शकत होते. आणि शनिवार-रविवार भटकायला शहराबाहेर फुकट जाता येत होते. पण लांबच्या अंतरावर पटकन जायचे असेल तर मात्र त्रास व्हायचा. शिवाय कुणाच्या घरी पार्टीला गेलं, की शेवटची ट्रेन कधी आहे हे पाहायला लागायचे किंवा कोणाकडे तरी लिफ्ट मागायला लागायची. लोक लिफ्ट द्यायचे पण हिला जेवायला बोलवायचं म्हणजे हिच्या येण्याजाण्याची सोय करायला पाहिजे असे लोकांना वाटू नये असं मला वाटायचं. पुण्याहून टेल्कोतून आलेल्या माझ्या काही सहकाऱ्यांकडे गाड्या होत्या पण ते सगळे फोर्ड कंपनीत होते आणि मी निस्सान मध्ये. अखेर मी गाडी खरेदी करण्याचे ठरवले. केवळ तीन-चार हजारांची पुंजी बँकेत असल्यामुळे नवीन गाडी घेण्याचा प्रश्नच नव्हता.

जुनी गाडी घ्यायची म्हणजे कटकट खूप. 'गाडी विकत घ्यायला गाडी लागते' अशी एक म्हण तिथे प्रचलित होती. आठवडाभर गाडी असणाऱ्या मित्रांना फोन करून कुणाला मला गाड्या पाहायला घेऊन जायला शनिवार-रविवार वेळ आहे हे पाहायचे. शनिवारी सकाळी लवकर उठून मिल्कबारमधे जाऊन ट्रेडिंग पोस्ट ही फक्त शनिवारी येणारी पत्रिका खरेदी करायची आणि चहा पीतापीता जुन्या गाड्यांच्या जाहिराती वाचायच्या. तेव्हा कोपऱ्या कोपऱ्यावर 'मिल्कबार' होते. ते सुपर मार्केट पेक्षा जास्ती वेळ उघडे असायचे आणि घराजवळ असल्यामुळे सोयीस्कर पडायचे. आपल्या अंदाजपत्रकात बसणाऱ्या किमतीच्या लहान गाड्या शोधायच्या आणि जास्त लांब नसतील तर 'शॉर्टलिस्ट' मधे टाकायच्या. प्रत्येक जाहिरातदाराला फोन करून भेटायची वेळ ठरवायची आणि मित्राला फोन करून त्या वेळा सांगायच्या. मग जाऊन गाडी प्रत्यक्ष पाहायची असा बेत प्रत्येक शनिवारी-रविवारी असायचा. जर लगेच गेलं नाही तर चांगल्या गाड्या विकल्या जायच्या; म्हणून ही सगळी धावपळ. जाहिराती वाचण्यासारखे कंटाळवाणे काम नसावे.

जुनी गाडी शक्यतो जपानी कंपन्यांची घ्यावी कारण जपानी गाड्या दणकटअसतात; जर गाडी बाईची किंवा म्हाताऱ्या माणसाची असेल तर ती चांगली, कारण बायका गाड्या बेदरकारपणे चालवत नाहीत, म्हातारी माणसे गाडी फक्त चर्चला जाण्यासाठी वापरतात, म्हणजे जास्त वापरत नाहीत; गाडी वरून चांगली दिसली तरी गाडीचे इंजिन आणि इतर मोठे भाग चांगले असतीलच असे नाही म्हणून गाडी नेहमी मेकॅनिककडून तपासून घ्यावी, असे नाना सल्ले मला सगळ्यांनी दिले होते. शिवाय गाडी किती दूर आहे हे ही महत्वाचे होते. माझ्या वाचण्यात काही मजेदार जाहिराती आल्या. एका जाहिरातीत 'गाडी चांगल्या घरात पडावी अशी इच्छा आहे' तर दुसऱ्या जाहिरातीत 'गाडीत इंजिन सोडून बाकी सगळे भाग आहेत' असे लिहिले होते.

हा उद्योग सुरू केल्यावर निस्सान मधले माझे सहकारी रॉड आणि जिम माझ्या मदतीला आले. खूप गाड्या पाहिल्या पण काही जमेना. शेवटी रॉड बरोबर जाऊन एक गाडी पसंत केली, किंमत ठरवली, शंभर डॉलर आगाऊ दिले, आणि दुसऱ्या दिवशी मेकॅनिकला पाठवते असे सांगितले. त्याचे घर खूप लांब होते. तासा-दीडतासाने रॉडने मला घरी सोडले आणि लगेच त्या माणसाचा फोन आला, "डिपॉझिट परत घेऊन जा. मला गाडी विकायची नाही." दुसऱ्या दिवशी ऑफिसात मी रॉडला हे सांगितले आणि परत एकदा त्या माणसाकडे घेऊन जायची विनंती केली कारण आगाऊ दिलेले शंभर डॉलर घ्यायला मला जावे लागणार होते. मी रॉडला म्हणाले, "मी मेकॅनिककडून गाडी तपासून घेते असे म्हणाले म्हणून कदाचित त्याने विचार बदलला असेल". रॉड म्हणाला, "नाही, गाडी चांगली होती, त्यामुळे मेकॅनिकला घाबरायचं काही कारण नव्हते. आपल्यानंतर आणखी कुणी त्याला ठरवलेल्या किमतीपेक्षा जास्त पैसे देऊ केले असतील". मी म्हणाले, "म्हणून तर त्याला डिपॉझिट दिले होते! माझ्या डिपॉझिटची काहीच किंमत नाही का?" ह्यावर रॉड जे म्हणाला ते ऐकून मला पाश्चात्य जगात असणारे यहुदी लोकांबद्दलचे गैरसमज पहिल्यादाच ऐकायला मिळाले. रॉड म्हणाला, "गाडीचा मालक नक्कीच यहुदी असला पाहिजे! नाही तर तो असा वागला नसता." "म्हणजे काय?" मी विचारले. रॉड म्हणाला, "लोक दिलेल्या शब्दाला मान देतात. आणि तू तर डिपॉझिट दिले होतेस. पण ह्या माणसाने स्वतःचा आपला फायदा पाहिला. आपण गेल्यावर आणखी एखादे गिऱ्हाईक आले असेल आणि त्याने जास्त किंमत देऊ केली असेल."

रॉड सारखा चांगला माणूस असा विचार करू शकेल हे मला खरंच वाटेना. मला, एका परदेशातून आलेल्या मुलीला मदत करायला तो नेहमी तयार असायचापहिल्यादा माझी ऑफिसात सगळ्यांशी ओळख झाली तेव्हा रॉडने माझे वर्णन 'वूमन कॉन्ट्रॅक्टर फ्रॉम अ थर्ड वर्ल्ड कंट्री' असे केले. त्यावर खूप हशा पिकला. कॉन्ट्रॅक्टर म्हणजे अगदी खालचा, त्यात मी बाई, ती सुद्धा एका गरीब देशातली, म्हणजे अगदीच हीन! पण हे सगळे गंमतीने चालले होते. खरं तर रॉड स्वतः आणि ऑफिसमधले अर्ध्याहून अधिक लोक कॉन्ट्रॅक्टर होते. माझ्या व्यतिरिक्त फक्त आणखी एक कॉन्ट्रॅक्टर महिला होती, लिझ. रॉडची आणि माझी चांगलीच गट्टी जमली होती. त्याने मला नवीन वर्षाच्या पार्टीला त्याच्या घरी बोलावले होते.

पुण्यात राहून यहुदी लोकांशी माझा फारसा संबंध आला नव्हता. नाही म्हणायला कॅम्पमधल्या नेहरू मेमोरिअल हॉलजवळ असलेली 'लालदेवल'ची इमारत म्हणजे यहुदी लोकांचे प्रार्थनास्थळ हे मला माहीत होते. आणि 'यहुदी की लडकी' हा एक जुना हिंदी सिनेमा आहे हे माहीत होतं. खरे म्हणजे माझ्या ओळखीचे दोन-तीन क्रिश्चन आणि मुसलमान सोडले तर बाकी सगळे हिंदूच होते. तरी सुद्धा नाझी इतिहास वाचल्यामुळे यहुदी लोकांबद्दल पाश्चात्य देशांमधले समज-गैरसमज मला माहीत होते. पण रॉडसारख्या सुशील आणि सुसंस्कृत व्यक्तीच्या तोंडून ते ऐकले आणि ते किती व्यापक आहेत याचा मला अनुभव आला.

यहुदी लोक म्हणजे निर्दय सावकार, कंजूष, आणि फक्त पैश्याला महत्व देणारे असा समज आहे. शेक्सपिअरने सुद्धा 'शायलॉक' ह्या 'द मर्चंट ऑफ व्हेनिस' मधल्या पात्रातून हा समज आणखीनच दृढ केला आहे. पुढे अनेक वर्षांनी ॲंड्रूने आणि मी बर्लिनच्या जुईश म्युझिअमला भेट दिली आणि यहुदी लोकांबद्दलचे अनेक गैरसमज कसे निर्माण झाले याची कारणे समजली. पुरातनकाळी यहुदी लोकांना काही व्यवसाय सोडून इतर सर्व व्यवसाय करायला बंदी होती. उधारीवर पैसे देणे म्हणजे 'पाप' करणे असा समज असल्यामुळे क्रिश्चन लोकांना हा व्यवसाय करायला बंदी होती आणि त्यामुळे बरेच यहुदी लोक हा व्यवसाय करायला लागले; कर्जदार आणि सावकार यांच्यातील नैसर्गिक तणावांना धार्मिक तणावांचे रूप दिले गेले आणि मग कंजूष आणि निर्दय अशी यहुदी लोकांची कायमची बदनामी झाली.

ईस्टरच्या सुट्टीत टेल्कोतले माझे दोन सहकारी, गुरु आणि साहू, ईस्ट मॉलव्हर्नला माझ्या घरी दुपारी जेवायला आले. माझी मुंबईहून आलेली मैत्रीण ईस्ट मॉलव्हर्नला 'मालवण' म्हणायची! ते आता फोर्ड मोटर कंपनीत काम करत होते आणि मी निस्सान मोटर कंपनीत. म्हणून गप्पा मारायला खूप विषय होते. संध्याकाळी आम्ही तिघे लोकलने त्यांच्या घरी निघालो. रेजरवॉर स्टेशनला उतरलो आणि चालत त्यांच्या घरी निघालो. एकदम पाऊस सुरु झाला म्हणून वाटेत असलेल्या एका मिल्कबारमध्ये घुसलो. पाऊस थांबायचे काही चिन्ह दिसेना. आमच्या गप्पाटप्पा सुरु झाल्या. साहूकडे मजेदार गोष्टींचा जणू ठेवाच होता. त्याने वर्णन करकरून सांगितलेली एक गोष्ट माझ्या अजून लक्षात आहे. टेल्कोत ट्रेनी इंजिनिअरच्या पदासाठी मुलाखत होऊन निवड झाल्यावर कंपनीच्या आवारात असलेल्या चिकित्सालयात सगळ्यांना वैद्यकीय तपासणी साठी पाठवले होते. साहू पण ह्या टोळीत होता. सगळ्यांना मूत्राचा नमुना द्यायला सांगण्यात आले. एका जरा बावळटशा मुलाने चक्क बादलीच नमुना म्हणून बाहेर आणली. सगळे ओठ दाबून हसू लागले. डॉक्टरसाहेब त्याला अत्यंत थंडपणे म्हणाले, "नमुना हवा आहे; बदलीभर मूत्र नको आहे." आता हसू दाबणे अशक्य झाले आणि सगळेजण उघडपणे हसू लागले. डॉक्टरांनी त्याला नमुना देण्याचा आदेश दिला होता खरा, पण आता तो 'रिकामा' झाला होता. म्हणून तास दोन तास त्याला थांबावे लागले. तो बराच वेळ पाणी पीत होता!

रात्र पडू लागली होती, दुकानाबाहेर पाऊस पडत होता, सोबतीला मित्र होते, आणि मुख्य म्हणजे हसण्याला ऊत आला होता. शेवटी पाऊस जरा कमी झाल्यावर आम्ही त्यांच्या घरी गेलो, स्वयंपाक केला, जेवलो आणि रात्रभर गप्पा मारत बसलो. दुसऱ्या दिवशी सकाळी तिथेच एक गाडी विकायला होती ती पाहायला गेलो. गाडी मला एकदम आवडली. गाडीचे मॉडेल १९७६चे टोयोटा करोना होते. गाडी एका बऱ्याच वर्षांपूर्वी निवृत्त झालेल्या माणसाची होती. गाडीला ऑटोमॅटिक ट्रान्समिशन होते. त्या शिवाय एअर कंडिशनर, हीटर, डीफ्रॉस्टर, रेडिओ, आणि कॅसेट प्लेयर होता, मग आणखी काय पाहिजे! पण तो किंमत फार मागत होता आणि मला अजून गाड्या पाहायच्या होत्या.

दुपारी मी नरेनला फोन केला. तो पुण्यात माझा बॉस होता आणि नुकताच मेलबर्नमधे राहायला आला होता. टेल्कोतर्फे एका कंपनीत मॅनेजर म्हणून त्याची नेमणूक झाली होती. पुण्यात त्याच्या हाताखाली तीस-चाळीस लोक होते पण इथे मात्र त्याच्या मदतीला एकच जण होता. मुख्य म्हणजे त्याला सेक्रेटरीची कमतरता फार वाटायची. पुण्यात अधिकारी होता म्हणून त्याच्या दिमतीला खूप कर्मचारी होते. घरचे पाहायला बायको होती. घरीदारी नोकर-चाकर होते. इथे मात्र स्वयंपाकापासून सफाईची कामे स्वतःच करायला लागायची; आणि ऑफिसात महत्त्वाच्या कामांबरोबर स्वतःचा चहा स्वतःला करायला लागायचा. कहर म्हणजे झेरॉक्स करणे, पत्रे लिहिणे असली कामे सुद्धा त्याला करायला लागायची. इथे आल्यापासून त्याने मला सांगितले, की सगळे मला इथे नरेन म्हणतात. मी पण मग 'सर' म्हणण्याच्या ऐवजी त्याला नरेन म्हणू लागले. चांगली गोष्ट म्हणजे तो मला मदत करायला उत्सुक होता म्हणून मी पण न घाबरता मदत मागितली. गुरु, साहू, नरेन, आणि मी असे आम्ही चौघे नरेनच्या गाडीतून, माझ्यासाठी गाडी शोधण्याच्या मोहिमेवर निघालो. त्या दुपारी आम्ही तीन गाड्या पाहिल्या आणि प्रत्येक गाडी म्हणजे एक अफलातून अनुभव होता. ... (क्रमशः)

***

## बृहन्महाराष्ट्र वृत्त- ऑनलाईन विभाग

**- पुरवणी विभाग:-**

**https://bmmonline.org/vrutta-supplements/**

**- 'मराठी विश्व न्यू जर्सी' - संक्रांत कार्यक्रम**

**- जागतिक कविता दिनानिमित्त - चारोळी**

**राशिभविष्य:- मार्च २०२३ - दादा दामले** (न्यू जर्सी)


**https://bmmonline.org/rashi-bhavishya/**




## मराठी भाषकांसाठी मनोरंजनाचा अद्‌भुत नवा खेळ

आवाहन:- कोणत्याही भाषेत अशी रचना करणे शक्य आहे का, की त्या रचनेमधील शब्दांची फोड केल्याने नवीन अर्थपूर्ण आशय निर्माण होऊ शकेल? मराठी भाषेत हा प्रयोग गंमतीचा व सहजसाध्य असावा या अंदाजाने हा खटाटोप! अशी रचना म्हणीसारखी संक्षिप्त, विशेष अर्थपूर्ण किंवा गहन विचारप्रवर्तक असल्यास अधिक छान!

*संस्मरण:- २०-२१ व्या शतकातील जगप्रसिद्ध, आणि मान्यताप्राप्त वैज्ञानिक, अल्बर्ट आइनस्टाइनचा जन्मदिवस १४ मार्च, १८७९ अमेरिकन पध्दतीनुसार जन्मदिन - 3/14 / रोजी आहे - हा "Pi Day" म्हणून साजरा केला जातो. ( First 3 digits of the mathematical constant pi: 3.14 )*




**- अरविंद नारळे** (टोरांटो, कॅनडा)

(वृत्त चाल मालिनी)
**'फलक वचन येई फार कामी जगाला'**
(फळ्यावरील वचन जगाला फार उपयोगाचे असते.)
(शब्दफोड करून)
**फल कवच न येई फार कामी जगाला'**
(फळांचे कवच जगाला विशेष उपयोगाचे नसते.)

***

**- विनता कुलकर्णी**

अरविंद नारळे यांच्या वरील पंक्तींवर माझ्या काही ओळींची भर पुढील प्रमाणे:-

(वृत्त चाल मालिनी)
**सकल स्मरति शाळा, कृष्णवर्णी फळ्याची**
**गुरु शिकवति तेथे, श्वेत जादू खडूची**
**'फलक वचन येई, फार कामी जगाला'**
**म्हणुनि फलक सांगे, नीतिसूत्रे मुलांना**
**...**

(*श्वेत जादू - white magic- that used for good purpose)

**'फलक वचन येई, फार कामी जगाला'**
**म्हणुनि पडति पैसे, जाहिराती दिसाया**
**...**

**'फल कवच न येई, फार कामी जगाला'**
**भुलवति बहुरंगी, बाह्य रूपे मनाला**

***

टीप:- "शब्दफोड" खेळात भाग घेण्यांस इच्छुक असणाऱ्यांनी आपली रचना **arvind.narale@sympatico.ca आणि vinata@gmail.com** या दोन्ही ईमेल पत्त्यांवर **महिन्याच्या २० तारखेपर्यंत, आपले नांव, गांव यांच्या उल्लेखासह** पाठवावी. आमच्याकडे आलेल्या रचनांमधील अर्थपूर्ण आणि उत्तेजनार्थ रचना बृहन्महाराष्ट्र वृत्ताच्या पुढील अंकात प्रकाशित करण्यात येतील. रचनांमधे काही सुधारणा आवश्यक असल्यास त्याबद्दल अरविंद नारळे आपणांस सुचवतील.

- या सदरातील सर्व चित्रे अरविंद नारळे यांची निर्मिती आहे.

***

## NAMASKAR

Charity giving to any entity in India is now easy with Foundation for Small Charities India, Inc. (FSCI) Granted by IRS A (501 (C)(3) Tax Exempt Status. An affiliate 'Foundation for Small Charity' (FSC) has the 80-G and FCRA required Registration in India, allowing you to give at will, without any red tape. India recipients of your giving need not be a registered charity. Your school or college never attempted to obtain tax exemption in India, which is very expensive.

We welcome repatriation of after-tax sales proceeds of realty by US Citizens of Indian origin. We will honor remittance of tuition fees by parents to colleges in the USA for their children from India.

**FSC is the answer.**
**Visit our Website "WWW.SmallCharity.Org", for more detail.**

**Or email to Admin@SmallCharity.Org .**

You will hear from Ramesh Sarva, CPA, 183 Broadway, #210, Hicksville NY 11801

## Join Donor List:

| | |
|---|---|
| JAGDISH & SHUBHANGI THAKUR | SWAROOP YOG & OTHER CHARITIES |
| RAVI & NILIMA BHIRUD | M. KARVE FONDN 16 NEW GIRLS EDU |
| RAHUL & PUNAM MUTHA | ANAND RISHI Hosp. C T SCAN |
| KOTESWARA RAO KUNDA, MD | EDUCATIONAL FOUNDATION, A.P. |
| KIRAN& NNDINI JOAG | V.T. PATIL FOUNDATION |
| KISHOR DANDEKAR | AMPTE FOUNDATIO |
| SUBHASH & VASANTI PURANIK | CASP, V.S. SAMITHI, PUNE, PATHAK RST |
| SUHASINI JOSHI | KOSMIC BEATS |
| KAMLAKAR &ARUNA PENDSE | ATHASHREE |
| PRAMILA SARVA | ADHAR |
| VIJAY NARINGREKAR | EDUCTION |
| MUKUND & SHAILA DIDOLAKE | AKKA DHOPESWAR MAHILA MANDAL |
| GOVIND & BHAKTI NADKARNI | SHANTA DUEGA TEMPLE, KAVLEM, GOA |
| | LD ENGG COLLEGE, LIBRARY REDEVALOPMENT |
| SHARAD PANJAPE | ATHASHREE, IMROVE FACILITIES FOR SENIORS |
| KAMALAKAR PENDSE | ATHASHREE |
| SUHASINI JOSHI | COSMIC BEATS |

# बृहन्महाराष्ट्र वृत्त

॥ मराठी तितुका मेळवावा ॥

**Subscription Remittance Address:**

**BMM Newsletter**
**20611 Whitebud CT.**
**Tampa FL 33647**

बृहन्महाराष्ट्र मंडळ



**नाते जुळते मनाशी मनाचे**




## Reshimgathee

**A BMM Matrimonial Initiative for Maharashtrians in North America**

https://reshimgathee.bmmonline.org/




Five-level "Marathi Language Learning"
progressive curriculum,
study guidelines, and
supporting materials
the BMM-Bharati Vidyapeeth's
joint certificates for
"Marathi Bhasha" examinations
after successful completion of
each level and passing criteria.
For BMM Marathi Shala Inquiries,
Email:- shala@bmmonline.org
https://bmmshala.net/

# बृहन्महाराष्ट्र वृत्त - पुरवणी

## मार्च, २०२३

**- (बृ. म. मंडळाच्या संकेतस्थळावर)-**

**https://bmmonline.org/vrutta-supplements/**

# 'मराठी विश्व न्यू जर्सी' संक्रांत कार्यक्रम

**- प्रिया गोडबोले** (एडिसन, न्यू जर्सी)

तुम्ही म्हणाल, "काय?, मार्च महिन्यातल्या 'वृत्त'मधे संक्रांतीचा लेख'? अहो, काय करणार, आमचा कार्यक्रमच झाला जानेवारीच्या शेवटाला, त्यामुळे फेब्रुवारीची लेख द्यायची शेवटची तारीख निघून गेली आणि सरते शेवटी मार्चमधे कुठेतरी जागा मिळाली, बघा!

तर मंडळी, तीळगूळ घेऊन आणि देऊन, गुळपोळी खाऊन, सर्वांनी गोड गोड बोलत बोलत आपापल्या घरी संक्रांतीचा कार्यक्रम उत्साहात साजरा केला असणार यात शंकाच नाही. मराठी विश्व, न्यू जर्सीचा संक्रांतीचा ह्या वर्षीचा पहिला कार्यक्रमसुद्धा अगदी तुमच्यासारखाच धूमधडाक्यात पार पडला, बरंका!

२०२२ची दिवाळी संपते ना संपते तोच आमच्या कार्यकारिणी मंडळाच्या सदस्यांनी संक्रांतीच्या कार्यक्रमाची आखणी सुरू केली. भरगच्च कार्यक्रमाची हमी तर आम्ही देत होतोच परंतु त्यासाठी सर्वांच्या सहकार्याची अत्यंत आवश्यकता होती आणि अर्थातच ती मिळाल्याची साक्ष म्हणजेच आमच्या कार्यक्रमाला लाभलेला उदंड प्रतिसाद आणि आलेल्या अगणित छान छान प्रतिक्रिया.

खूप वर्षांनी पुन्हा एकदा लहानग्यांना बोरन्हाण घालायचे ठरले आणि सर्वांचा उत्साह अचानक वाढला. भारतात बोरन्हाण करतो त्याचप्रमाणे सर्व तयारी सुरू झाली. एक महत्त्वाचा पण खेळ स्वरूपातला शिशुसंस्कार म्हणून लहान मुलांना बोरन्हाण घातले जाते. उत्तम आरोग्यासाठी ही पारंपरिक पद्धत तर आहेच, परंतु, लहान मुलांना या बदलत्या ऋतूची बाधा होऊ नये म्हणून या ऋतूत मिळणारी ताजी फळं व भाज्या म्हणजेच बोर, हरबरा, उसाचे तुकडे, भुईमुगाच्या शेंगा, चुरमुरे, गोळ्या, चॉकोलेटं इत्यादी त्यांच्या डोक्यावरुन अलगद ओतल्या जातात.

यंदा कार्यक्रमाला आलेल्या पाच वर्षाखालील मुलांना सुद्धा हाच अनुभव 'मराठी विश्व'ने अगदी भरभरून दिला. अजून एक पोचपावती म्हणजे हे चालू असताना एकही मूल रडलं नाही. मुलं खुश म्हणून पालक शांत, आणि आम्ही निवांत! हो की नाही?

या वर्षी काहीतरी नवीन करावे, ह्या उद्देशाने आम्ही उखाण्यांची स्पर्धा आयोजित केली होती. फक्त बायकांचीच नाही तर पुरुषांची सुद्धा.

सुरुवातीला चाचपडत पुढे येऊन काही पुरुषांनी उखाणे म्हंटले. पण जेव्हा ९६ वर्षांच्या चिटणीस आजोबांनी अतिशय उत्साहाने चिटणीस आजींचे नाव घेतले, तो क्षण आमच्या सर्वांसाठी खूप प्रेरणादायी होता. त्या नंतर मात्र सुमारे ४०-४५ पुरुषांची रांगच लागली आणि एकाहून एक अप्रतिम उखाणे सर्वांना ऐकायला मिळाले.

काहींनी पारंपरिक, 'भाजीत भाजी मेथीची' पासून, काही विनोदी, काही इंग्रजी मिश्र, काही चावट, काही स्वरचित असे नानाविध विषय उखाण्यातून ऐकवले आणि सर्वांनी त्याचा मनसोक्त आनंद लुटला.

अर्थात 'उखाणा' हा ज्यांचा बालेकिल्ला आहे त्या सर्व उपस्थित स्त्रियांनी उखाण्यांची जणू माळाच बांधली; आणि दिवाळीतल्या लवंगा फुटाव्यात तसे एकाहून एक उखाणेरूपी फटाके फुटत गेले.

त्या अनोख्या उखाण्यांच्या तंद्रीतून बाहेर पडतोय न पडतोय, तोच, मॉर्गनविल, न्यू जर्सीच्या मराठी शाळेच्या शिक्षकांनी, 'हैदोस रंगमंच' प्रस्तुत, 'भोजनाला नक्की येणार तरच RSVP देणार', हे निराळ्या विषयावरचे लघुनाट्य सादर केले!

अजून एक भन्नाट स्पर्धा ह्या वर्षी आम्ही घोषित केली. ती म्हणजे साड्या नेसून 'Ramp Walk' करायची! तीन भागात विभागलेली ही स्पर्धा सगळयांना खूप आनंद देऊन गेली.

खणाच्या साड्या नेसून, सुंदर दागिन्यांनी नटून थटून सर्व ललनांनी सुरेख रॅम्प वॉक केला. 'Saree With a Twist' या स्पर्धेत सर्व स्पर्धकांनी नवनवीन आधुनिक प्रकारांनी साड्या परिधान करून, अतिशय सुरेख रीतीने आपल्या वेशभूषेचे सादरीकरण केले. सरते शेवटी, Family Ramp Walkने सगळ्यांची मने जिंकली. कुटुंबातील सर्वांनी एकत्र येऊन पारंपरिक पोशाखात सुरेख असे चित्र आमच्या समोर गुंफले.

परीक्षकांना विजेते निवडणं अर्थातच खूप कठीण होतं, पण आमच्या दृष्टीने सर्वच सादरकर्ते विजेते होते. कुणामधेही आम्ही तसूभरही फरक केला नाही. प्रत्येक विजेत्यांना बक्षिसे देण्यात आली. सर्व रॅम्प वॉकच्या विजेत्यांना मुगुट (Crown) देऊन मराठी विश्व राज्ञी (Queen) घोषित करण्यात आले.

न्यू जर्सीतल्या गुरुवायुरप्पन मंदिरात हा कार्यक्रम झाल्यामुळे 'मराठी विश्व'ने तिथल्याच मुदपाकखान्यातल्या सात्विक जेवणाची सोय केली होती. सर्वांनी प्रसन्न मनाने प्रसादरुपी भोजन करून आणि हळदीकुंकवाचे सुरेख वाण घेऊन तृप्त मनाने या धम्माल कार्यक्रमाची सांगता केली.

मराठी विश्वने अशा मनमोहक कार्यक्रमाची सांगड तर घातलीच, परंतु, त्यात आपली मराठी संस्कृती जपण्याचा आणि नवीन पिढीपर्यंत पोहोचवण्याचा नेहमीप्रमाणेच प्रामाणिक प्रयत्न केला. सर्व मराठी विश्व कार्यकारिणी मंडळाच्या सदस्यांचे आणि अनेकानेक स्वयंसेवकांचे मनापासून आभार, ज्यांच्या अथक परिश्रमामुळे हा कार्यक्रम आनंदाने पार पडला.

टीप:- कार्यक्रमाची काही क्षणचित्रे- पुढील पानावर.

***

## 'मराठी विश्व न्यू जर्सी' संक्रांत कार्यक्रम- काही क्षणचित्रे






## जागतिक कविता दिन -२१ मार्च- निमित्त

- **कांचन गोडबोले** (क्लीव्हलँड, ओहायो)

### शब्दांचा प्रवास

कविता करणे, नाही प्रसिद्धीचा हव्यास,
हा तर मनातून आलेल्या शब्दांचा प्रवास,
वाटते केवळ पोचवावा प्रत्येक जणास,
बरे वाटते 'शेअर' करताना आपल्या मनास!
***

### कवितांचे भावविश्व

मनामध्ये विचार प्रकटले,
विचार शब्दांत सामावले,
शब्दांमधून वाक्यात पोचले,
कवितारुपी भावविश्वात व्यक्त केले!
***